# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२१ दि.१० मार्च,२०२१

**बातमी क्र.१**

जळगाव दि.१०(प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या प्रभारी अधिष्ठातापदी शहादा येथील पुज्य साने गुरूजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य आर.एस.पाटील यांची नियुक्ती करण्यात आली असून उर्वरित प्रभारी अधिष्ठाता यापूर्वीचेच ठेवण्यात आलेले आहेत.

प्रभारी कुलगुरू प्रा.ई.वायुनंदन यांनी १० मार्च रोजी प्रभारी अधिष्ठांताच्या नियुक्तीचे आदेश काढले. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा.ए.बी.चौधरी यांच्या रिक्त झालेल्या जागी प्राचार्य आर.एस.पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता म्हणून प्राचार्य पी.पी.छाजेड (पालेशा महाविद्यालय,धुळे), मानव विज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता म्हणून प्राचार्य पी.एम.पवार (धनदाई कला महाविद्यालय, अमळनेर),आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठातापदी प्राचार्य अशोक राणे( केसीईचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय,जळगाव) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या शिवाय विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या प्रभारी सहयोगी अधिष्ठाता म्हणून डॉ.एस.पी.शेखावत( बांभोरी अभियांत्रिकी महाविद्यालय,जळगाव) व प्राचार्य व्ही.बार.पाटील (फार्मसी महाविद्यालय, फैजपूर) यांची आणि मानव विज्ञान विद्याशाखेचे प्रभारी सहयोगी अधिष्ठाता म्हणून प्राचार्य बी.युवाकुमार रेड्डी (मणियार विधी महाविद्यालय,जळगाव) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**बातमी क्र.२**

जळगाव दि.१० (प्रतिनिधी) कोविड-१९ चा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेऊन जळगावच्या जिल्हाधिकाऱ्यांनी ११ मार्च रोजी रात्री ८ ते १५ मार्च सकाळी ८ पर्यंत जनता कर्फ्यु जाहीर केल्यामुळे या कालावधीत विद्यापीठ बंद राहणार आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी जळगाव शहर महानगर पालिका हद्दीतील शैक्षणिक संस्था/शाळा/महाविद्यालये/परिसंस्था व विद्यापीठ १५ मार्च रोजी सकाळी ८ वाजेपर्यंत बंद राहतील असे कळविण्यात आले आहे. त्यानुसार विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव प्रा.बी.व्ही.पवार यांनी परिपत्रक प्रसिध्द केले आहे. जनता कर्फ्युच्या काळात पुर्व नियोजित परीक्षांचे ऑनलाईन/आर्फलाईन कामकाजाची कार्यवाही सुरू राहील. संबंधीत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन वेळेत परीक्षेच्या कामासाठी उपस्थित रहावे असेही या परिपत्रकात म्हटले आहे.

---------------------------------------------------------------------------------

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी